# जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावे - डॉ. घोष स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता थीम

September 15, 2024

## जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावे - डॉ. घोष




धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे स्वच्छता ही सेवा २०२४ ही मोहीम दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे राबवावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले आहे.

पुढे बोलताना डॉ घोष म्हणाले की, यावर्षीच्या स्वच्छता ही सेवा या मोहिमेसाठी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता.... ही थीम निश्चित केली आहे. या मोहिमेत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात १७ सप्टेंबर रोजी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून अभियानाचा शुभारंभ करण्यात येईल. तर १८ सप्टेंबर रोजी सफाई मित्र सुरक्षा शिबिर घेण्यात येणार असून सफाई मित्रासाठी एक खिडकी योजनेद्वारे लाभ देण्यात येईल. तसेच १९ सप्टेंबर रोजी अस्वच्छ ठिकाणांची कायमस्वरूपी स्वच्छता करण्यात येणार आहे. तर २० सप्टेंबर रोजी गावातील खाऊ गल्लीच्या ठिकाणी निघणाऱ्या कचऱ्यांची लोकसहभागातून स्वच्छता करण्यात येणार असून २१ सप्टेंबर रोजी संस्कृतिक कार्यक्रमाद्वारे स्वच्छतेसाठी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच २२ सप्टेंबर रोजी एकल प्लॅस्टिक न वापरण्याबाबत जनजागृती तर २३ सप्टेंबर रोजी गृहभेटीद्वारे जनजागृती करून...एक झाड आईच्या नावे....उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच २४ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर स्वच्छता ज्योत, मॅरेथॉन सायकल मॅरेथॉन, स्वच्छता रॅली, मानवी साखळी तर २५ सप्टेंबर रोजी शाळा व महाविद्यालयात टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे स्पर्धा, व २६ सप्टेंबर रोजी सार्वजनिक शौचालयाची साफसफाई व दुरुस्ती. तसेच २७ २० सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत स्वच्छ वार्ड स्पर्धा तर २८ २० सप्टेंबर रोजी वैयक्तिक स्तरावर कंपोस्ट खतखड्डा व शोषखड्डा निर्मिती करणे व २९ सप्टेंबर रोजी स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत निर्मिती करण्यात आलेल्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात येणार असून ३० सप्टेंबर रोजी स्वच्छतेची वाहने व उपकरणांची स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तर १ ऑक्टोबर रोजी स्वच्छता प्रतिज्ञा व २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता दिवस साजरा करण्यात येणार आहे. या अभियानात ग्रामपंचायतीसह गावातील सर्व शाळा, अंगणवाडी, शासकीय कार्यालये, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन उपक्रमात हिरीरीने सहभागी होऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवावी असे आवाहन अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका प्रांजल शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) श्याम गोडभरले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अनोल ताकभाते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) देवदत्त गिरी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिवाजी पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंखे यांनी केले आहे.

**स्वच्छता ही सेवा या मोहिमे अंतर्गत दि.१९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात....एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी.... महाश्रमदान करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व गावांनी यात सहभागी होऊन सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत श्रमदान करावे. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक- युवती, सेवाभावी संस्था, समाजसेवक, महिला बचत गट यांचा सहभाग राहणार आहे. या महाश्रदानात प्राधान्याने धार्मिक, अध्यात्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, नदी किनारे, कार्यालय, व्यावसायिक व बाजारपेठ आदी परिसरात स्वच्छता करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.**

# जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा २०२४ अभियान ग्रामपंचायतीने प्रभावीपणे राबवावे : डॉ. मैनाक घोष

धाराशिव : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यास अनुसरून दरवर्षीप्रमाणे स्वच्छता ही सेवा २०२४ ही मोहीम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ग्रामपंचायतींनी राबवावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले.

यावर्षीच्या ' स्वच्छता ही सेवा' या मोहिमेसाठी ' स्वभाव स्वच्छता', 'संस्कार स्वच्छता' ही थीम निश्चित केली आहे.या मोहिमेत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात १७ सप्टेंबरला सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून अभियानाचा शुभारंभ करण्यात येईल, १८ सप्टेंबरला सफाईमित्र सुरक्षा शिबिर घेण्यात येणार असून सफाई मित्रासाठी एक खिडकी योजनेद्वारे लाभ देण्यात येईल, १९ सप्टेंबरला अस्वच्छ ठिकाणांची कायमस्वरूपी स्वच्छता करण्यात येणार आहे, २० सप्टेंबरला गावातील खाऊ गल्लीच्या ठिकाणी निघणाऱ्या कचऱ्यांची लोकसहभागातून स्वच्छता करण्यात येणार आहे, २१ सप्टेंबरला सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे स्वच्छतेच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात येणार आहे, २२ सप्टेंबरला एकल प्लॅस्टिक न वापरण्याबाबत जनजागृती, २३ सप्टेंबरला गृहभेटीद्वारे जनजागृती करून ' एक झाड आईच्या नावे' उपक्रम राबविण्यात येणार आहे.

२४ सप्टेंबरला तालुकास्तरावर स्वच्छता ज्योत, मॅरेथॉन सायकल मॅरेथॉन,स्वच्छता रॅली, मानवी साखळी, २५ सप्टेंबरला शाळा व महाविद्यालयात टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे स्पर्धा, २६ सप्टेंबरला सार्वजनिक शौचालयाची साफसफाई व दुरुस्ती, २७ ग्रामपंचायत स्वच्छ वार्ड स्पर्धा,२८ सप्टेंबरला वैयक्तिक स्तरावर कंपोस्ट खतखड्डा व शोषखड्डा निर्मिती करणे, २९ सप्टेंबरला स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत निर्मिती करण्यात आलेल्या प्रकल्पाचे उद्घाटन करणे, ३० सप्टेंबरला स्वच्छतेची वाहने व उपकरणांची स्वच्छता व सुशोभीकरण करणे, ०१ ऑक्टोबरला स्वच्छता प्रतिज्ञा तर २ ऑक्टोबरला स्वच्छता दिवस साजरा करण्यात येणार आहे या अभियानात ग्रामपंचायतीसह गावातील सर्व शाळा,अंगणवाडी,शासकीय कार्यालये, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन उपक्रमात हिरीरीने सहभागी होऊन ही मोहीम यशस्वीपणे राबवावी असे आव्हान अति.मुकाअ विलास जाधव, प्रकल्प संचालिका श्रीमती प्रांजल शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) श्याम गोडभरले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल ताकभाते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) देवदत्त गिरी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिवाजी पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंखे यांनी केले आहे.

स्वच्छता ही सेवा या मोहिमेअंतर्गत दिनांक १९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात *एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी* महाश्रमदान करण्यात येणार आहे.धाराशिव जिल्ह्यातील सर्व गावांनी यात सहभागी होऊन सकाळी ०८ ते १० वाजेपर्यंत श्रमदान करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

यात स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी,शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक- युवती, सेवाभावी संस्था,समाजसेवक, महिला बचत गट यांचा सहभाग राहणार आहे.या *महाश्रदानात* प्राधान्याने धार्मिक,अध्यात्मिक स्थळे,पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू,संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, नदी किनारे, कार्यालय, व्यावसायिक व बाजारपेठ आदी परिसरात स्वच्छता करण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

# आलमला येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे उद्घाटन

औसा : आलमला. दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रोजी रविवारीआलमला ता. औसा जि. लातूर येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे नागसेन नगर आलमला येथे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास मा. प्रभाकरजी कापसे अध्यक्ष लातूर जिल्हा ग्रंथालय संघ. श्रीमती जयश्री कोरे जि.प शाळा शिक्षिका. श्री विश्वनाथजी बिराजदार विकास सोसायटी चेअरमन .श्री शिवकुमार पाटील जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष .श्री विकास वाघमारे सरपंच.

यांच्या उपस्थितीत व गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत वाचनालयाचे उद्घाटन झाले .माननीय प्रभाकर कापसे सर यांनी अलमला गावातील सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असणाऱ्या सर्व नागरिकांचे योगदान खूप अमूल्य आहे असे सांगितले भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने व विचाराने प्रेरित झालेल्या युवकांनी गावामध्ये वाचनालयाची संकल्पना केली ही खूप आनंदाची व प्रेरणाची बाब आहे असे मनोगत व्यक्त केले.